आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

५ ऑक्टोबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मुंबई आणि ठाण्याला भविष्याच्या दृष्टीनं तयार करण्यासाठी महायुतीला साथ देण्याचं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- ठाणे आणि वाशिममधून प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ५६ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या विविध कामांचं भूमीपूजन आणि लोकार्पण

- लाडकी बहीण योजना बंद करण्याची कोणामध्येही हिंमत नाही, विविध निर्णयांमुळं राज्य सरकार लाडकं सरकार झाल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन

- अनुसूचित क्षेत्रातल्या १७ संवर्गांमध्ये निवड प्रक्रियेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना मानधन तत्त्वावर नियुक्त करण्याचे राज्य सरकारचे आदेश

**आणि**

- आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवणं आणि देशात जातनिहाय जनगणना करण्याचं लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचं आश्वासन

**<><><><><>**

मुंबई आणि ठाण्याला भविष्याच्या दृष्टीनं तयार करण्यासाठी महायुतीला साथ देण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. ठाण्यात पायाभूत सुविधांच्या ३२ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या विविध कामांचं भूमीपूजन आणि लोकार्पण केल्यावर ते बोलत होते. यात बीकेसी ते आरे दरम्यानच्या मेट्रो ३ चं उद्घाटन, ठाणे वर्तुळाकार मेट्रो आणि मुंबईत घाटकोपर जवळच्या छेडा नगरपासून ठाण्यातल्या आनंद नगरपर्यंतच्या पूर्वमुक्त महामार्गाच्या विस्तारीत भागाची पायाभरणी

यांचा समावेश आहे. याशिवाय 'नैना' अर्थात नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्रातल्या विकासकामांचा पहिला टप्पा, ठाणे महापालिकेच्या नव्या इमारतीचं भूमीपूजन प्रधानमंत्र्यांनी केलं.

हे प्रकल्प मुंबई आणि ठाण्याला नवीन ओळख देतील. आमच्या सरकारचे सर्व निर्णय, संकल्प आणि स्वप्न विकसित भारतासाठी असतात, असं त्यांनी सांगितलं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी काँग्रेस आणि महाविकास आघाडीवर जोरदार टीकास्त्र सोडलं.

महाविकास आघाडी पुन्हा सत्तेत आली तर महायुती सरकारच्या योजना बंद करेल. त्यांच्या कार्यकाळात सरकारी पैसा महिलांच्या नव्हे तर दलालांच्या हाती जाईल, असा दावा प्रधानमंत्र्यांनी केला. मुंबई महानगर क्षेत्रातल्या विकासकामांमध्ये महाविकास आघाडीनं अडथळे आणले. यामुळं मुंबई मेट्रो ३ प्रकल्पाची किंमत १४ हजार कोटी रुपयांनी वाढली. हा जनतेच्या पैशाचा अपव्यय असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. विकास कामं थांबवणाऱ्यांना सत्तेत येण्यापासून रोखा. काँग्रेस आणि महाविकास आघाडीचं स्वप्न पूर्ण होऊ देऊ नका आणि इतिहासातून धडा घेऊन एकजूट कायम ठेवा, असं आवाहन प्रधानमंत्री मोदी यांनी नागरिकांना केलं.

**होल्ड प्रधानमंत्री ३**

भाषणाच्या सुरुवातीला प्रधानमंत्र्यांनी राज्यातली साडेतीन शक्तीपीठं, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना नमन केलं. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देणं हा महान परंपरेचा सन्मान असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड प्रधानमंत्री ४**

विकास आणि विश्वास ही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची दोन रुपं आहेत. स्वातंत्र्यानंतरचा मुंबईचा सर्वाधिक विकास सध्या सुरू असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केलं. प्रत्येक क्षेत्रात महाराष्ट्र पहिल्या

क्रमांकावर असून वेळेत काम पूर्ण करण्याचं लक्ष समोर ठेवून सरकार काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं. महाविकास आघाडी सरकारनं या मेट्रोसह मुंबई महानगर क्षेत्रातली अनेक कामं थांबवली असा आरोप त्यांनी केला.

मेट्रो ३ च्या कामात मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांनी अडथळे आणले असा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केला. राहुल गांधी यांनी आज कोल्हापुरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण केलं. याचा संदर्भ देत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुस्तकातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या उल्लेख प्रकरणी माफीची मागणी फडनवीस यांनी राहुल गांधी यांच्याकडे केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नव्या मेट्रोतून प्रवास केला. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे लाभार्थी, विद्यार्थी आणि कामगार यांच्याशी संवाद साधला. सर्वसामान्य नागरिकांसाठी सोमवारी पहाटेपासून ही मेट्रो सुरू होणार आहे. याशिवाय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

सर्वजण एकत्र राहून विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्रासाठी काम करू, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज वाशिममधल्या पोहरा देवी इथं केलं. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या १८ व्या, आणि प्रधानमंत्री नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या ५ व्या हप्त्याचं वितरण प्रधानमंत्र्यांनी आज केलं. तसंच कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत १ हजार ९२० कोटी रुपयांचे साडे सात हजाराहून अधिक प्रकल्प त्यांनी राष्ट्राला समर्पित केलं.

शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करणाऱ्या १९ मेगावॅट क्षमतेच्या ५ सौर ऊर्जा प्रकल्पांचं लोकार्पण प्रधानमंत्र्यांनी केलं. छत्रपती संभाजीनगर, नांदेड, अकोला, बुलढाणा आणि कोल्हापूर जिल्ह्यात हे सौर प्रकल्प आहेत. त्यापूर्वी बंजारा

विरासत संग्रहालयाचं उद्धाटन त्यांनी केलं. या ४ मजली संग्रहालयात बंजारा समाजाची माहिती देणारी १३ प्रदर्शनं आहेत.

**<><><><><>**

लाडकी बहीण योजना बंद करण्याची हिंमत कोणामध्येच नाही. राज्य सरकारनं घेतलेल्या विविध निर्णयांमुळं आपलं सरकारं हे लाडकं सरकार झालं आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. आजचा दिवस आनंदाचा असून सुवर्ण अक्षरात लिहून ठेवण्याचा आहे. यामुळं खऱ्या अर्थानं बंजारा समाजाची काशी इथं उभी राहिली, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या संग्रहालयाचं, त्यातल्या दर्जेदार कामाचं कौतुक केलं. सर्वांनी हे संग्रहालय पहायला यावं, असं आवाहन त्यांनी केलं. मृद आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी यावेळी बोलताना बंजारा समाजाच्या हितासाठी विविध मागण्या केल्या.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल सर्वांनी यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

**<><><><><>**

अहमदनगर जिल्ह्याचं नाव आता अहिल्या नगर झालं आहे. हे नामकरण करणारी अधिसूचना राज्य सरकारनं काल राजपत्रात प्रसिद्ध केली. केंद्रीय गृहमंत्रालयानं १ ऑक्टोबर रोजी पाठवलेल्या पत्रात या नामकरणाला मंजुरी दिली होती. त्यामुळं अहमदनगर जिल्हा, तालुका आणि शहराचे नाव आता अहिल्यानगर झाले आहे.

**<><><><><>**

पेसा अर्थात अनुसूचित क्षेत्रातल्या १७ संवर्गांमध्ये निवड प्रक्रियेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना मानधन तत्त्वावर नियुक्त करण्याचे आदेश राज्य सरकारनं

आज दिलं. शिक्षक, तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षिका, कृषी सहायक, आरोग्य सेवक अशा सुमारे ७ हजार पदांवर ही नियुक्ती होणार आहे. पहिल्या पगाराइतकं मानधन या उमेदवारांना दिलं जाईल. ही भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात आल्यावर सर्वोच्च न्यायालयात याला आव्हान देण्यात आलं होतं. त्यानंतर राज्य सरकारनं भरती प्रक्रिया थांबवली होती.

**<><><><><>**

आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवणं आणि देशात जातनिहाय जनगणना करण्याचं आश्वासन लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज दिलं आहे. राज्यघटना वाचवण्यासाठी हे दोन सर्वांत महत्त्वाचे मार्ग असल्याचं त्यांनी कोल्हापूर इथं संविधान सन्मान संमेलनात सांगितलं. जातनिहाय जनगणना हा देशाचा एक्स-रे आहे आणि यासंबंधीचा कायदा आम्ही संसदेत मंजूर करून दाखवू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

तत्पूर्वी, कोल्हापुरातल्या कसबा बावडा इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण राहुल गांधी यांनी केलं. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारधारेचं आजच्या काळातलं प्रतीक म्हणजे भारताची राज्यघटना आहे. ही विचारधारा महाराष्ट्राच्या मातीनं, जनतेनं घडवलेली आहे. शिवाजी महाराज, शाहू महाराज यांच्या विचारातून राज्यघटना साकारली असल्याचं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. शिवरायांच्याच विचारधारेचा संघर्ष आज राज्यघटना संपवू पाहणाऱ्या विचारधारेशी सुरू आहे, असं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

राज्य सरकारनं खरीप हंगाम २०२४-२५ करता आधारभूत खरेदीसाठी निश्चित केलेल्या हमीभावानुसार  मूग, उडीद आणि  सोयाबीन खरेदीची नोंदणी सुरु असून या तिन्ही उत्पादनांच्या प्रत्यक्ष खरेदीला येत्या १० तारखेपासून सुरुवात

होणार आहे. शेतकऱ्यांनी आपल्या तालुक्यातल्या नजीकच्या नाफेड खरेदी केंद्रावर आवश्यक त्या कागदपत्रांसह नोंदणी करावी असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

<><><><><>

निर्जनस्थळी गस्त वाढवण्यासह पोलिसांना दक्ष राहण्याचे आदेश विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज दिले. पुण्यात पोलिसांच्या बैठकीनंतर त्या बोलत होत्या. निर्जनस्थळी रात्रीच्या वेळी प्रकाश झोत आणि भोंग्यांची व्यवस्था करावी, सीसीटीव्ही कॅमेरे लावून त्याची वेळोवेळी देखरेख व्हावी, अशा सूचना गोऱ्हे यांनी दिल्या.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ले जवळ निवती समुद्रात मच्छीमारी नौका पलटी होवून घडलेल्या दुर्घटनेत दोन मच्छीमारांचा  मृत्यू झाला. ही घटना काल मध्यरात्री घडल्याची माहिती निवती इथल्या पोलिसांनी दिली.

<><><><><>

इराणी चषकासाठी मुंबई आणि शेष भारत यांच्यात उत्तरप्रदेशात लखनऊ इथं झालेला कसोटी सामना अनिर्णित राहिला, मात्र पहिल्या डावातल्या आघाडीच्या जोरावर मुंबईनं विजेतेपद पटकावलं. हे मुंबईचं विक्रमी १५वं विजेतेपद ठरलं आहे. पहिल्या डावातला द्विशतकवीर मुंबईचा सर्फराज खान याला सामनावीराच्या पुरस्कारानं गौरवलं गेलं.

<><><><><>

राज्यातून मान्सूनचा परतीचा प्रवास आजपासून सुरू झाला. नंदुरबार जिल्ह्यातून आज मान्सून परतल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे.  उर्वरीत महाराष्ट्रातून पुढच्या आठवड्यात मान्सून पूर्णपणे माघारी जाईल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**